MHAH080011082019

# नियमित दिवाणी दावा क्र.५९३/२०१९ मधील नि.५१ वरील आदेश

*(शांताराम तात्याबा थोरात विरुद्ध साहेबराव रमाजी गवांदे व इतर)*

*(दिनांक ०३/०७/२०२४)*

सदरचा अर्ज वादीने मयत प्रतिवादी क्र.५ सुदाम साहेबराव गवांदे यांचे वारस दाव्याच्या अभिलेखावर दाखल करुन घेणेसाठी दाखल केला आहे.

०२. वादीने सदरचा अर्ज दाखल करुन असे कथन केले आहे की, वादीने सदरचा दावा निरंतर मनाई हुकूमासाठी दाखल केला आहे. सदर दाव्याचे कामकाज चालू असताना सदर दाव्यातील प्रतिवादी क्र. प्रतिवादी क्र.५ सुदाम साहेबराव गवांदे यांचे दिनांक ३१/०७/२०२२ रोजी निधन झाले आहे. सदर प्रतिवादी क्र.५ यांचे दाव्याचे कामी त्यांचे वारस दाव्याचे अभिलेखावर दाखल करणे गरजे आहे. प्रतिवादी क्र.५ याचे वारस खालीलप्रमाणेः–

वारस ५अ– आशा सुदाम गवांदे, वय ५२ वर्षे, धंदा घरकाम,
५ब– सिध्दांत सुदाम गवांदे, वय २६ वर्षे, धंदा व्यवसाय,,
५क– कांचन सुदाम गवांदे, वय २२ वर्षे, धंदा शिक्षण,
सर्व रा. पोखरी हवेली, ता. संगमनेर, जि. अहमदनगर.

सदर दाव्याचे कामी प्रतिवादी क्र.५ यांचे वारस अभिलेखावर घेतल्यास प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. तसेच प्रतिवादी क्र.५ यांचे वारस अभिलेखावर घेतल्यानंतर दाव्याचा निर्णय हा गुणवगुणावर निर्णय घेणेस मदत होणार आहे. सदरची दुरुस्ती न्यायाच्या दृष्टीने होणे उचीत होणार आहे. सबब, वादी यांनी सदरचा अर्ज मंजूर करण्याची विनंती करुन दाव्यामध्ये दुरूस्ती करण्यास परवानगी मागितली आहे.

०३. प्रतिवादी यांनी सदर अर्जावरच म्हणणे दाखल केले असून त्यांनी असे कथन केले आहे की, सदरचा अर्ज खरा नाही म्हणुन मान्य नाही. सदर दाव्यातील वादीने जाणिवपुर्वक व हेतुपुर्वक सदरचा अर्ज देण्यास उशिर केला आहे. दाव्याचे कामकाज लांबविणे हा वादींचा हेतु आहे. सदर अर्जात वादीने वारस रेकॉर्डवर घेण्यास झालेला उशिराचे कारण नमुद केला नाही. सदरचा अर्ज नामंजुर करण्यात यावा. जर यादा कदाचित मे.कोर्टाचे असे मत झाले की वादीचा अर्जमंजुर करावा तर वादीला

जास्तीत कॉस्ट करण्यात यावी ही नम्र विनंती. सदरचा अर्ज हा जास्तीच्या खर्चासहीत रकमेस मंजूर करणेत यावा.

**०४.** सदर अर्जाकामी वादी व प्रतिवादी यांचा युक्तिवाद ऐकला. प्रतिवादी क्र.५ हे मयत झालेबाबत त्यांचे मृत्यूचे प्रमाणपत्राची प्रत अभिलेखावर दाखल आहे. सदर दावा दुरुस्तीमुळे मुळ दाव्याचे स्वरुप बदलत नाही. सदर दावा गुणांवगुणावर निर्णीत होण्यासाठी सदर दावा दुरुस्ती गरजेची आहे. प्रस्तावित दुरुस्तीमुळे प्रतिवादींचे काही नुकसान होणार नाही व दाव्याचे मुळ स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. दुरुस्ती तांत्रिक स्वरुपाची आहे. सदरची दावा दुरुस्ती न्यायाच्या दृष्टीने आवश्यक असल्यामुळे प्रस्तुत अर्ज हा वादी यांनी प्रतिवादी यांना झालेल्या विलंबासाठी खर्चासहित मंजुर करणे योग्य व उचित होईल. या सर्व बाबी विचारात घेता, खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज (नि.५१) खर्चासह मंजूर करण्यात येतो.

२. वादी यांनी प्रतिवादींना रक्कम रु. २००/– खर्च दयावा.

३. वादी व प्रतिवादी यांनी नोंद घ्यावी.

संगमनेर
दि.०३/०७/२०२४.

स्वाक्षरीत/-
( श्रीमती एस. बी. ढवळे )
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, संगमनेर.